आकाश बोरवेल
धनराज शंभरकर
9890426850
8669852630
प्लॉट, मकान और खेती मे बोरवेल किये जाते है. सबमर्सिबल पंप्स, HDP Pipes, केबल, रोप, पंप फिटींग सामान के विक्रेता.
रेणुका विहार कॉलेनी के पास, शताब्दी चौक, रिंग रोड, नागपूर-२७

RNI NO. MAHMAR/2020/84035
BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ
गुरूवार, २७ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९१ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thursday, 27 March 2025 | Year : 5 | Issue : 91 | Daily | Rate: Rs. 5/-

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

## मंत्री साहेब, आमचे शिक्षण थांबवू नका!
## विद्यार्थ्यांची आर्त हाक

**अमरावती :** संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्यासाठी रचनात्मक चळवळीचा एक भाग म्हणून राज्यभरातून विद्यार्थ्यांचे पत्र पाठवले जात आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिली. अमरावती जिल्ह्यातून देखील मोठ्या संख्येने पत्र पाठवले जात आहेत, असे शिक्षक समितीचे नेते गोकुलदास राऊत, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले

15 मार्च 2024 शासन निर्णयानुसार 2024-25 संच मान्यता अंतिम करण्यात आली आहे. शिक्षण कायद्यातील तरतुदीच्या व 28 ऑगस्ट 2015 (सुधारित 8 जानेवारी 2016) विसंगत अशा शासन निर्णयाने शाळांमध्ये शिक्षकच असणार नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यात हजारो शिक्षक तर अतिरिक्त होतीलच; परंतु शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडसर निर्माण होणार आहे. शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने किंवा अत्यंत कमी शिक्षक उपलब्ध असल्याने पालकांना आपल्या पाल्यांना परगावच्या शाळेत दाखल करणे क्रमप्राप्त होईल त्यातून प्रामुख्याने किशोरवयीन मुला-मुलींच्या शिक्षणाची परवड होईल व मुलींची सुरक्षितता धोक्यात येण्याची स्थिती आहे. सोबतच बाहेरगावी दररोज जाणे-येणे करण्याचे स्थितीमुळे गळतीचे प्रमाण वाढेल. इयत्ता 6 वी ते 7/8 वीची पटसंख्या 20 किंवा 20 पेक्षा कमी असल्यास 1 नियमित शिक्षक मंजूर केला आहे. परंतु सदर बाब सुद्धा शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीस विसंगत आहे.

बालकांचे शैक्षणिक नुकसान करणारा 15 मार्च 2024 चा शासन निर्णय अद्यापही रद्द करण्यात आलेला नाही. राज्यातील शाळांतील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वतःच्या गावातील शिक्षण मिळवण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने 17 मार्च 2025 रोजी संपूर्ण राज्यातुन आंदोलन केले होते. आता हा नविन उपक्रम शिक्षक समितीने हातात घेतला

> कमी पटामुळे आमच्या शाळेतील शिक्षक कमी होणार असे कळले आहे. आम्हाला गावातच शिकवण्यासाठी शिक्षक राहू द्या. कमी शिक्षक असले तर आमचे शिक्षण होणार नाही. बाहेरगावी जाण्यामुळे त्रास होईल व शिक्षण बंद होईल. पुरेसे शिक्षक असले तरच आमचे शिक्षण चांगले होऊ शकते. आमचे शिक्षण थांबवू नका. तुम्ही आमच्या हिताचा नक्कीच विचार कराल असा विश्वास आहे, अशा मजकुराचे पत्र राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांना विद्यार्थ्यांकडून पाठवले जात आहे.





### राज्य सरकार खासगी शिकवण्यांचे नियमन कसे आणणार ?

**मुंबई :** राज्यातील खासगी शिकवण्यांचे नियमन करण्यासाठीच्या विधेयकाचा मसुदा तयार करण्यात आला असून जुलै महिन्यात होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात तो मंजुरीसाठी सादर केला जाईल, अशी माहिती राज्य सरकारने मंगळवारी उच्च न्यायालयात दिली. देशातील अलिकडच्या घडामोडी लक्षात घेता राज्य सरकार खासगी शिकवण्यांचे नियमन कसे आणणार ? त्यादृष्टीने धोरण कधी आखले जाणार ? असा प्रश्न मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने उपस्थित केला. या मागणीसाठी फोरम फॉर फास्ट जस्टिस इन एज्युकेशन या संस्थेने 1999 मध्ये जनहित याचिका दाखल केली होती आणि आपण सध्या 2025 मध्ये आहोत. त्यामुळे, खासगी शिकवण्यांसाठी नियमन धोरण आखण्यासाठी तुम्हाला आणखी वेळ हवा आहे, असा टोला खंडपीठाने सरकारला हाणला. त्याचप्रमाणे, सरकारला या प्रकरणी वास्तववादी राहावे लागेल, असेही मुख्य न्यायमूर्तींनी सुनावले. त्यानंतर उपरोक्त माहिती सरकारच्यावतीने न्यायालयाला देण्यात आली.

## महादेव बुक प्रकरणात सीबीआयचे देशभरात 60 ठिकाणी छापे

**मुंबई :** केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) महादेव बुक बेटींग अॅप प्रकरणात बुधवारी देशभरात 60 ठिकाणी छापे टाकले. त्यात छत्तीसगड, भोपाळ, कोलकाता आणि दिल्लीतील ठिकाणांचा समावेश असून ही ठिकाणे राजकारणी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, महादेव बुकचा प्रमुख हस्तक, तसेच या प्रकरणात सामील असलेल्या खासगी व्यक्तींशी संबंधित आहेत. देशभरात सट्टेबाजीच्या अॅपचे जाळे विणणारे रवी उप्पल व सौरभ चंद्राकर हे विनाअडथळा अवैध सट्टेबाजीचे नेटवर्क चालविता यावे यासाठी राजकारणी व अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाच देत असल्याच्या संशयावरून सीबीआयने ही कारवाई केली.





या छाप्याचा संबंध महादेव बुक बेटिंग अॅपशी आहे. या सट्टेबाजी अॅपचे प्रवर्तक रवी उप्पल आणि सौरभ चंद्राकर सध्या दुबईत आहेत. याप्रकरणी सुरूवातीला रायपूरच्या आर्थिक गुन्हे शाखेने (ईओडब्ल्यू) गुन्हा नोंदवला होता, परंतु नंतर छत्तीसगड सरकारने हे प्रकरण सीबीआयकडे सुपूर्द केले. त्यानंतर आता सीबीआय वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि इतर आरोपींच्या भूमिकेची सखोल चौकशी करीत आहे. छाप्यादरम्यान अनेक भक्कम डिजिटल आणि दस्तऐवजी पुरावे सापडले आहे. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी ते जप्त केले असून हे छापे सध्या सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. भारतातील ऑनलाईन बेटिंग अॅप युएईमधून चालवण्यात येत असून त्याची संगणकीय यंत्रणा, संकेतस्थळाची यंत्रणा नेदरलँडमध्ये आहे. अॅपचा प्रचार करण्यासाठी नेपाळ, यूएई व श्रीलंका येथून कॉल सेंटर चालवण्यात येत असल्याचा ईडीला संशय आहे. व्हॉट्स अॅपद्वारे या अॅपची जाहिरात केली जाते. त्याला प्रतिसाद दिल्यानंतर ती माहिती कॉल सेंटरपर्यंत पोहोचते. तेथून सर्व माहिती दिल्यावर संबंधित व्यक्तीचे आभासी खाते उघडण्यात येते. त्यानंतर त्यात रक्कम भरून अॅपद्वारे बेटिंग केले जाते. या सर्व यंत्रणेसाठी देशभरात चार ते पाच हजार पॅनल ऑपरेटर कार्यरत आहेत. त्यापैकी सर्वाधिक ऑपरेटर छत्तीसगड, मुंबई आणि दिल्ली येथे आहेत. प्रत्येक ऑपरेटर किमान 200 ग्राहक सांभाळतो. या सर्व व्यवहारातील 30 टक्के रक्कम ऑपरेटरला मिळते. उर्वरित रक्कम पुढे पाठवली जाते. या अॅपद्वारे दररोज सुमारे 200 कोटी रुपयांचा फायदा मिळत असल्याचा अंदाज आहे. महादेव अपचे प्रवर्तक सुमारे 4 ते 5 अॅप चालवत असल्याचा संशय आहे. या टोळीचे बेटिंग अॅप पाकिस्तानातही सुरू असल्याची माहिती ईडीच्या हाती लागली होती.

## बलात्कारासंबंधीच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाची तीव्र नाराजी

**नवी दिल्ली :** अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका वादग्रस्त निकालावर स्थगिती दिली आहे. अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने 17 मार्च रोजी दिलेल्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाने संज्ञान घेत सुनावणी करण्याचा निर्णय घेतला होता. यावर आज सुनावणी घेण्यात आली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालावर स्थगिती दिली आहे. एका अल्पवयीन मुलीवरील बलात्काराच्या खटल्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला निकाल वादग्रस्त ठरला होता. पीडितेच्या स्तनांना स्पर्श करणे, तिच्या पायजम्याची नाडी सोडणे आणि पीडितेला ओढून पुलाखाली नेण्याचा प्रयत्न करणे या गोष्टी बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यासाठी पुरेशा नाहीत, असं अलाहाबद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राम मनोहर नारायण मिश्रा यांनी म्हटले होते. यावर सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की 'अलाहाबाद उच्च न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे असंवेदनशील व अमानवी दृष्टीकोन दर्शवतो.'

> "आम्हाला याप्रकरणी निकाल देताना आणि उच्च न्यायालयाचा निकाल चुकीचा असल्याचे सांगताना खेद वाटतो की त्यांच्या काही टिप्पण्यांमध्ये संवेदनशीलतेचा आभाव दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने अलाहबाद उच्च न्यायालयाच्या निकालावर कठोरपणे असहमती दर्शवली आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई म्हणाले, 'उच्च न्यायालयाचा निकाल आमच्यासाठी धक्कादायक होता.'
>
> - सर्वोच्च न्यायालय





अलाहाबाद उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांच्या एकलपीठाने बलात्काराच्या खटल्याचा निकाल देताना म्हटले होते की 'गुन्हा करण्याची तयारी आणि वास्तवात गुन्हा करणे यात खूप अंतर आहे.' अल्पवयीन मुलीने दोन आरोपींविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यात तिने म्हटले होते की आरोपींनी तिच्या गुप्तांगांना स्पर्श केला, पायजम्याची नाडी तोडून तिला ओढून पुलाखाली नेण्याचा प्रयत्न केला गेला.

## टेंभू योजनेची बंदिस्त पाईप लाईन

आटपाडी : आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प 'टेंभू' टेंभू उपसा सिंचन योजनेला अनिल बाबर यांचे नाव. टेंभू हे महाराष्टातील सातारा जिल्ह्यातील कराडजवळील कृष्णा नदीच्या पूर्व तीरावर वसलेले एक छोटेसे गाव आहे . दुष्काळग्रस्त सातारा जिल्ह्याला पाणीपुरवठा करण्यासाठी टेंभू येथे 9अब्ज रुपयांचा सिंचन प्रकल्प उभारण्यात आला कृष्णेचे पाणी दुष्काळी भागातील शेतकऱ्याचे भाग्य बदलत आहे आणि याचे श्रेय टेंभू योजनेला जाते.

फेब्रुवारी 1996 रोजी या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानंतर 17 ऑगस्ट 2007 रोजी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने या प्रकल्पाला मान्यता दिली. आणि अखेर केंद्र शासनाच्या नियोजन विभागाने 3450, 35 कोटी रुपये निधीला 1 जुन 2011 रोजी मान्यता देऊन प्रकल्पाला गती दिली. आटपाडी येथील डबई कुराणातील बौद्ध समाज सामुदायिक सह, शेती संस्थेच्या जमीन हद्दीतून टेंभू योजनांची बंदीस्त पाईप लाईनची पाहणी करताना विलास खरात, बाबूराव खरात, संतोष मोटे, नंदकुमार खरात, कुमार मोटे हे उपस्थित होते



## भारत व पाकिस्तान अमेरिकेपेक्षाही सुरक्षित!



**नवी दिल्ली :** जगातील सर्वात सुरक्षित देशांच्या यादीत अमेरिका 89 व्या स्थानावर आहे. जागतिक महासत्ता असलेल्या आणि उद्योगासह शिक्षणासाठी जगभरातील लोकांची सर्वाधिक पसंती असलेल्या या देशाचा सुरक्षिततेच्या बाबतीत इतका खालचा क्रमांक पाहून अनेकांना धक्का बसू शकतो. विशेष म्हणजे भारत व पाकिस्तान हे देश सुरक्षिततेच्या बाबतीत अमेरिकेच्या पुढे आहेत. जगातील सर्वात सुरक्षित देशांच्या यादीत पाकिस्तानचा 65 वा आणि भराताचा 66 वा क्रमांक आहे. अॅण्डोरा हा दक्षिण युरोपातील छोटासा देश जगातील सर्वात सुरक्षित देश असल्याचं नुम्बेओच्या सेफ्टी इंडेक्समध्ये म्हटले आहे. कुठेही फिरायला जाताना, जगभर भ्रमंती करताना वैयक्तिक सुरक्षेला प्राधान्य देणाऱ्या लोकांसाठी हा देश सर्वोत्तम आहे. अॅण्डोराच्या एका बाजूला फ्रान्स तर दुसऱ्या बाजूला स्पेन हे दोन देश आहेत. हा एक भूपरिवेष्टित देश आहे.

## नागपूरच्या आणखी एका आमदाराकडून पोलिसांवर शंका



**नागपूर :** पोलिसांवर शंका घेणे म्हणजे गृहखात्यावर शंका घेणे, याचाच दुसरा अर्थ हे खाते सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अविश्वास दाखवणे असा होतो. याची पूर्ण कल्पना असतानाही नागपूर दंगल प्रकरणी भाजपचेच आमदार स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर शंका उपस्थित करीत आहेत, त्यामुळे भाजप नेतृत्वाचा आमदारांवरील धाक कमी झाला का ? असा सवाल केला जात आहे. 17 मार्चला रात्री महाल भागातील काही वस्त्यांमध्ये उसळलेली दंगल आता निवळली असून जनजीवनही पूर्वपदावर आले आहे. मात्र या घटनेच्या अनुषंगाने पोलिसांच्या भूमिकेवर आत्ताही प्रश्न उपस्थित करणे सुरूच आहेत. हे प्रश्न उपस्थित करणारे लोकप्रतिनिधी विरोधी पक्षाचे असेल तर तो त्यांचा अधिकार म्हणून समजण्यासारखे आहे, मात्र एका पाठोपाठ एक सत्तापक्ष म्हणजे भाजपचेच आमदार पोलिसांच्या कारवाईवर शंका घेऊ लागले आहेत, तेही खुद्द नागपूरकर देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असताना. त्यामुळे भाजप आमदारांना झाले तरी काय ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ज्या महाल भागात दंगल उसळली त्या भागाचे म्हणजे मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके यांनी दंगलीच्या दुसऱ्याच दिवशी या घटनेला पोलीस जबाबदार आहेत, खोपडे यांनी काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या कार्यशैलीवर प्रश्न उपस्थित केले असून त्याच्या भूमिकेची चौकशी व्हावी अशी मागणी केली, ज्या दिवशी ही घटना घडली, त्यावेळेस काही अधिकारी घटनास्थली हजर होते.त्यांच्यापुढे हिंसाचार सुरू होता. पण त्यांनी तो थांबवण्याचा प्रयत्न केला नाही, असा आक्षेप खोपडे यांनी घेतला आहे.

## भंगार विक्रीतून रेल्वेच्या तिजोरीत कोट्यवधींची भर

**मुंबई :** पश्चिम रेल्वेने 'शुन्य भंगार' मोहीम हाती घेतली असून या मोहिमेचा भाग म्हणून रेल्वेच्या हद्दीतील भंगार गोळा करून त्यांची विक्री करण्यात येत आहे. पश्चिम रेल्वेला 2024-25 या वर्षात भंगार विक्रीतून तब्बल 507.78 कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळाला आहे. पश्चिम रेल्वेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर भंगार पडून आहे. त्यात रेल्वे रुळाचे भाग, खांब, धातूचे विविध साहित्य आदींचा समावेश आहे. या भंगारामुळे जागा अडून राहते, अस्वच्छता होते, तसेच पावसाळ्यामध्ये पाणी साचून डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे पश्चिम रेल्वेने आपल्या हद्दीतील भंगार साहित्य हटविण्याचा निर्णय घेतला आणि 'शुन्य भंगार' मोहीम हाती घेतली. या मोहिमेत प्रत्येक विभाग, कारखाना आणि कारशेडमधील भंगाराचे साहित्य गोळा करण्यात येत आहे.



पश्चिम रेल्वेला 2024-25 आर्थिक वर्षात भंगार विक्रीतून 507.78 कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळाला आहे. शुन्य भंगार मोहिमेत गोळा करण्यात आलेल्या भंगार साहित्यात लोह, स्टील, अॅल्युमिनियम, पितळ, तांबे व इतर धातूच्या वस्तूंची विक्री करण्यात आली. त्याचबरोबर कालबाह्य झालेले रेल्वेचे डबे, वाघिणी, इंजिन, जुने डबे, माल डबे, चाक आदींची विक्री करण्यात आली. या भंगार साहित्याच्या विक्रीतून पश्चिम रेल्वेला 21 मार्च 2025 पर्यंत 507.78 कोटी रुपये मिळाले असून रेल्वे मंडळाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टापेक्षा ते 27 टक्के जास्त आहे. भंगाराच्या विक्रीतून कोट्यवधी रुपयांची कमाई होते. त्याचबरोबर रेल्वे परिसर स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ठेवण्यास मदत होते. पडीत भंगारामुळे अस्वच्छ झालेला परिसर या मोहिमेमुळे स्वच्छ झाला आहे.

## मंगल मिरवणुकीत वाजवलेल्या गाण्यांमुळे जामा मशिदीजवळ दोन गटांत दगडफेक



**झारखंड :** झारखंडमधील हजारीबागच्या झेंडा चौकात रामनवमीपूर्वी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत गाणी वाजवण्यावरून मंगळवारी रात्री उशिरा परिसरात दोन समुदायांमध्ये तणाव निर्माण झाला होता. पोलीस ठाण्याच्या हद्दीती असलेल्या जामा मशिदीजवळ ही मिरवणूक पोहोचली तेव्हा मिरवणुकीत वाजवल्या जाणाऱ्या गाण्यांवरून वाद झाला. त्यानंतर या वादाचे रूपांत दगडफेक आणि तोडफोडीत झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. असे असले तरी अद्याप या प्रकरणात कोणाचीही धरपकड किंवा कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. यावेळी परिस्थिती अस्थिर होऊ नये म्हणून पोलिसांनी तातडीने कारवाई केली, लाठीमार केला आणि जमावाला पांगवण्यासाठी हवेत चार राउंड गोळीबारही करावा लागला.

## संविधान संवर्धनासाठी सज्ज होण्याची गरज

### येवले संविधान लोककला साहित्य संमेलन



**नाशिक :** संविधान संवर्धनासाठी सज्ज होण्याचे आवाहन करतानाच केंद्र आणि राज्य सरकारने शालेय व विद्यापीठ स्तरावर संविधान हा स्वतंत्र विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा, प्रबुद्ध लोककला विद्यापीठाची स्थापना करावी, यासह एकूण 10 ठराव येवला येथे आयोजित पहिल्या संविधान लोककला साहित्य संमेलनात मांडण्यात आले.लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), शिक्षण विभाग, भारतीय अकॅडमी, कास्ट्राईब शिक्षक संघटना, राष्ट्र सेवादल, अध्यापकभारती यांच्या संयोजनात हे संमेलन येवला येथील जनता विद्यालयाच्या प्रांगणात झाले. संमेलनाचे उदघाटक उत्तम कांबळे यांनी, लोककला संविधानाला नवे रूप देऊ शकतील, असा विश्वास व्यक्त केला. व्यवस्थेच्या बरगड्या तोडून जे उगवते त्याला मरण नाही. गुलामीच्या जगण्यातून बाहेर काढण्यासाठी हे संविधान बळ देते असे त्यांनी सांगितले. संमेलनाध्यक्ष लोकशाहीर संभाजी भगत यांनी, मातीतले गाणे मारण्याचे काम या देशात चालू असल्याचे सांगितले. मनुवाद्यांनी संविधान जाळण्याची हिम्मत दिल्लीत केली होती. यावर थोडेफार वगळता कोणीही बोलले नाही. संविधानाबद्दल बोलणे हा भविष्यात गुन्हा ठरू शकेल, असा कायदा येतो आहे. याचा सरकारला जाब विचारण्याची गरज त्यांनी मांडली. गायक नंदेश उमप यांनी, पोवाड्यासारखी संविधानाची कथा सांगितली गेली पाहिजे, असे सांगितले.

संमेलनाचे संस्थापक कार्याध्यक्ष शरद शेजवळ यांनी भारतीय संविधानिक विचार, तत्व, मूल्यांचा प्रचार प्रसार व संवर्धन विविध सांस्कृतिक कलाविष्कारातून लोक प्रबोधन-सामाजिक प्रबोधन करण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन केल्याचे नमूद केले. व्यासपीठावर श्यामसुंदर महाराज सोन्नर, शाहीर हमीद सय्यद, स्वप्नील डुंबरे, प्रवीण जाधव, राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे, गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, प्रा. तुळशीराम जाधव हेही उपस्थित होते. नाशिकमध्ये दोन लाखाहून अधिकची लाच स्वीकारताना गटविकास अधिकारी जाळ्यात संचालन वनिता वाघ, नम्रता ससाणे, रंजना भोये यांनी केले. आभार अजिज शेख, गोकुळदास वाघ यांनी मानले. प्रारंभी आझाद चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून संविधान सन्मान फेरी काढण्यात आली. विंचूर चौफुलीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

**संमेलनातील ठराव :**
1) केंद्र व राज्य सरकारने शालेय व विद्यापीठ स्तरावर संविधान हा स्वतंत्र विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.
2) सामाजिक लोकप्रबोधनासाठी प्रबुद्ध लोककला विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी.
3) इयत्ता 11 आणि 12 वी वर्गांसाठी संविधान हा विषय स्वतंत्र 50 गुणांसाठी निश्चित करावा.
4) नवीन शैक्षणिक धोरणात होणारे शिक्षणाचे धार्मिकीकरण खासगीकरण तत्काळ थांबवावे.
5) संविधानिक मूल्य व्यवस्था आपल्या कलाकृतीतून अग्रक्रमाने मांडण्याचा प्रयत्न निर्माते, लेखक, दिग्दर्शक, साहित्यिक, कलावंत यांनी सातत्याने करावा. यांसह एकूण 10 ठराव मांडण्यात आले.

बहुजन सौरभ
वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक
यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ
आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रु. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

